# फिरोदिया महाविद्यालयात 'थेमिसिया ४.०' कायदे महोत्सव उत्साहात




**पुणे** : डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचलित श्री नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय येथे आयोजित 'थेमिसिया ४.०' या कायदेविषयक महोत्सव व दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. १३) उत्साहात पार पडले.

उद्घाटन लाकुलिश योग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विवेक महेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित शिक्षणपद्धतीचे महत्त्व अधोरेखित करत उच्च शिक्षणामध्ये मूल्याधिष्ठित दृष्टिकोन विकसित करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून माजी आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक स्पर्धात्मक युगात भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान व नेतृत्वगुण आत्मसात करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रम प्रसंगी माननीय प्राचार्या डॉ सुनीता आढाव आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. अशोक पलांडे यांनी महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी भारतीय ज्ञान परंपरा याविषयी सखोल अभ्यास करावा अशी आशा व्यक्त केली.

या महोत्सवामध्ये आंतरमहाविद्यालयीन कायदेविषयक प्रश्नमंजुषा, विधेयक मसुदा लेखन स्पर्धा तसेच न्यायनिर्णय विश्लेषण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याच कालावधीत 'भारतीय ज्ञानपरंपरेच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचे रूपांतर' या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमास ॲड. अशोक पलांडे, प्राचार्य डॉ. सुनीता आढाव यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी, संशोधक व कायदेविषयक अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सदर परिसंवादाच्या समन्वयक म्हणून डॉ. अनघा बलदोटा आणि सहा. प्राध्यापिका अनुजा शर्मा यांनी केले.


**मार्गदर्शन** ● **डॉ. राधाकृष्णन पिल्लई यांचे प्रतिपादन; आंतरराष्ट्रीय परिसंवाद उत्साहात**

# विद्यार्थ्यांनी ज्ञानपरंपरेचा अभ्यास करावा

▸ **पुणे, शहर प्रतिनिधी.** भारतीय ज्ञानपरंपरेच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचे रूपांतर या माध्यामातून विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण विकसित करावेत आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन चाणक्य इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ लिडरशिप स्टडीजचे संस्थापक, संचालक डॉ. राधाकृष्णन पिल्लई यांनी केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचलित श्री नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे आणि हेरिटेज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कुंदनमल फिरोदिया सभागृह येथे आयोजित 'थेमिसिया ४.०' या कायदेविषयक महोत्सव व दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा तसेच 'भारतीय ज्ञानपरंपरेच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचे रूपांतर' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हेरिटेज फाउंडेशनचे संचालक भुजंग बोबडे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता आढाव, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष आणि महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अँड. अशोक पलांडे, धनंजय कुलकर्णी आदी मान्यावर उपस्थित होते.




## कायदेविषयक प्रश्नमंजुषा, विधेयक मसुदा लेखन स्पर्धा

भुजंग बोबडे यांनी विद्यार्थ्यांना संस्कृती आणि मूल्ये जपत पुढे जाण्याचे मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. सुनीता आढाव यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि संशोधनवृत्ती वाढते, असे त्यांनी सांगितले. महोत्सवात कायदेविषयक प्रश्नमंजुषा, विधेयक मसुदा लेखन आणि न्यायनिर्णय विश्लेषण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. समारोप प्रसंगी विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.